# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ

**बातमी क्र. ०१**

जळगाव दि. २८ ( प्रतिनिधी ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाद्वारा बी.बी.ए., बी.एम.एस.(ई-कॉमर्स), बी.सी.ए., एम.एम.एस. (कॉम्प्युटर मॅनेजमेंट), एम.एम.एस.(पर्सोनेल मॅनेजमेंट), एम.सी.ए. (इंटिग्रेटेड), व एम.बी.ए.(इंटिग्रेटेड) या पदवी व पदव्युत्तर व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी दुसरी केंद्रीय सामाईक प्रवेश पूर्व परीक्षा **मंगळवार, दि.२६ जूलै, २०२२** रोजी आयोजित करण्यात आली आहे.

केंद्रीय सामाईक प्रवेश परीक्षांचे सहा परीक्षा केंद्र आहेत ते पुढीलप्रमाणे १) के.सी.ई.सोसायटीचे आय.एम.आर.,जळगाव २) भुसावळ कला,विज्ञान आणि पी.ओं.नाहाटा वाणिज्य महाविद्यालय, भुसावळ ३) बी.पी.कला, एस.एम.ए.विज्ञान व के.के.सी. वाणिज्य महाविद्यालय,चाळीसगाव ४) झेड.बी.पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, धुळे ५) आर.सी.पटेल कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शिरपूर ६) एस.टी.को-ऑप.इन्स्टीटयुट ऑफ मॅनेजमेंट रिसर्च ॲण्ड डेव्हलपमेंट, शहादा.

यासाठी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर (www.nmu.ac.in) दि.२७ जुन पासून ऑनलाईन अर्ज उपलब्ध् होतील. १५ जुलै पर्यंत संकेतस्थळावर अर्ज भरता येतील. विद्यापीठाने घोषीत केलेल्या स्वीकृती केंद्रावर १६ जुलै पर्यंत अर्ज स्वीकारले जातील. प्रवेश अर्जासोबत योग्य ती कागदपत्रे आणि पाचशे रुपयांचा धनाकर्ष जोडावा. २० जुलै रोजी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रवेश पात्र विद्यार्थ्यांची यादी प्रसिध्द केली जाईल. २१ जुलै पर्यंत त्यावर लेखी स्वरुपात स्वीकृती केंद्रावर आक्षेप नोंदवता येतील. २२ जुलै रोजी पात्र विद्यार्थ्यांची यादी जाहीर होऊन २३ रोजी परीक्षा प्रवेशपत्र (हॉलतिकीट) संकेतस्थळावर उपलब्ध होणार असून प्रवेश पत्रावर विद्यार्थ्याचा फोटो व त्यावर प्राचार्यांचा सही व शिक्का घ्यावा. २६ जुलै रोजी वरील परीक्षा केंद्रावर परीक्षा होईल अशी माहिती केंद्रीय प्रवेश प्रक्रिया समितीचे अध्यक्ष प्रा.अनिल डोंगरे यांनी दिली.

---

बातमी क्र. ०२

## सिनेट पदवीधर निवडणूक : आज विद्यापीठात सहविचार सभा

जळगाव दि.२८ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या अधिसभेच्या नोंदणीकृत पदवीधरांच्या दहा जागांच्या निवडणूकी संदर्भात विद्यापीठाचे कुलगुरु प्रा.व्ही.एल.माहेश्वरी यांच्या अध्यक्षतेखाली विविध पदवीधर विद्यार्थी संघटनांचे प्रतिनिधी तसेच इतर इच्छुक नागरिक यांच्यासमवेत उद्या बुधवार दि.२९ जून रोजी सहविचार सभेचे आयोजन विद्यापीठात करण्यात आले आहे.

या सभेत विद्यापीठाचे प्रभारी प्र-कुलगुरु प्रा.एस.टी.इंगळे, प्रभारी कुलसचिव प्रा.के.एफ.पवार व निवडणूक कक्षाचे विभाग प्रमुख डॉ. एस.आर.भादलीकर हे देखील उपस्थित असणार आहेत. बुधवार दि.२९ जून रोजी दुपारी ३.३० वाजता विद्यापीठाच्या अधिसभा सभागृहात ही सहविचार सभा होणार आहे. नोंदणीकृत पदवीधरांच्या निवडणूकीसाठी पदवीधरांचे विद्यापीठाच्या नोंदवहीत नाव नोंदणी करण्यासाठी व नोंदणीकृत पदवीधरांच्या मतदार यादीत नावे समाविष्ठ करण्यासाठी विद्यापीठाकडून जाहिर

प्रकटन, नोंदणीकृत पदवीधरांचे अर्ज विद्यापीठ संकेतस्थळावर उपलब्ध करुन देणे याबाबतची कार्यवाही सुरु आहे. या निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर विविध पदवीधर विद्यार्थी संघटनांचे प्रतिनिधी व नागरिक यांच्यासमवेत विचार विनिमय करण्यासाठी या सहविचार सभेचे आयोजन करण्यात आले आहे. या सभेसाठी प्रतिनिधी व इच्छूकांनी स्वखर्चाने उपस्थित राहावे असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी तथा प्रभारी कुलसचिव प्रा. किशोर पवार तसेच निवडणूक विभागप्रमुख डॉ.एस.आर.भादलीकर यांनी केले आहे.

---

बातमी क्र. ०३

जळगाव दि.२८ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातून बी.ए.पदवी अभ्यासक्रमात राज्यशास्त्र विषयांत प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास ' **कै.सौ.शांताबाई धडू भावसार'** यांच्या स्मरणार्थ सुवर्णपदक प्रदान करण्यासाठी सदानंद भावसार यांनी दोन लाख रूपयांचा धनादेश कुलगुरू प्रा.व्ही.एल.माहेश्वरी यांच्याकडे सुपूर्द केला.

पारोळा येथील सदानंद भावसार यांनी बी.ए. (राज्यशास्त्र) या विषयांत विद्यापीठातून प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास त्यांच्या मातोश्री कै.सौ.शांताबाई धडू भावसार, बहादरपूर यांच्या नावे सुवर्णपदक जाहिर केले आहे. त्यांनी दोन लाख रूपयांचा धनादेश दि.२८ जून,२०२२ रोजी कुलगुरू प्रा.व्ही.एल.माहेश्वरी यांच्याकडे सुपूर्द केला. यावेळी प्रभारी प्र्-कुलगुरु प्रा.एस.टी.इंगळे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक प्रा.दीपक दलाल, प्रभारी वित्त व लेखा अधिकारी एस.आर.गोहिल, प्रा.राम भावसार, प्रा.संजय भावसार हे उपस्थित होते.

---

जा.क्र.कबचौउमवि/१६/बातमी-प्रवेश/हस्तदेय दि.२८ जून, २०२२

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

उपरोक्त बातमी आपल्या दैंनिकात जळगाव, धुळे व नंदुरबार जिल्हयातील आवृत्तीत प्रसिद्ध करावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी